

# सुवर्णमहोत्सवी वर्षात पंचगंगा बँकेचे पदार्पण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पंचगंगा बँकेच्या सुवर्णमहोत्सवी पदार्पणाचा शुभारंभ देवकर पाणंद येथील शाखेत उत्साहात पार पडला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शहर उपनिबंधक पी. एल. जगताप, बँकेचे अध्यक्ष राजाराम शिपुगडे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी डॉ. शिर्के यांनी एका हातात ठेवीदारांचा विश्वास व दुसऱ्या हातात कर्जदारांची पत यावर बँकेची प्रगती अवलंबून आहे. बँकेच्या विविध उपक्रमांमुळे ठेवीदारांचा विश्वास वाढत चालला आहे. उपनिबंधक पी. एल. जगताप यांनी सहकारी संस्थांनी स्पर्धेच्या युगात आपले अस्तित्व टिकवणे हे मोठे आवाहन आहे, त्यातून ५० वर्षांची केलेली वाटचाल कौतुकास्पद आहे. यावेळी राष्ट्रपतिपदक विजेते पोलिस निरीक्षक तानाजी सावंत यांचा सत्कार करण्यात आला. बँकेच्या कार्याचा आढावा राजाराम शिपुगडे यांनी घेत ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्तींसाठी घरपोच सेवा योजनेचा शुभारंभ करत असल्याचे जाहीर केले. स्वागत सीईओ दीपक फडणीस यांनी केले. आभार उपाध्यक्ष राहुल भोसले यांनी मानले. यावेळी बँकेचे संचालक, ग्राहक व सभासद उपस्थित होते. यानिमित्ताने जीवनधारा ब्लड बँकेच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात शंभरहून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# विद्यापीठे, महाविद्यालयांचे २०२२ पर्यंत होणार नॅक मूल्यांकन

## उच्च शिक्षण संस्थांसाठी किमान २.५ गुण आवश्यक

**कोल्हापूर : : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत यूजीसीने उच्चशिक्षण गुणवत्ता सुधारण्यासाठी कडक नियमावली तयार केली आहे. राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालयांना २०२२ पर्यंत राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषदेची (नॅक)ची मान्यता घ्यावी लागणार आहे. शिक्षण संस्थेकडे २.५ किंवा त्यापेक्षा जास्त गुण असणे गरजेचे असणार आहे.

केंद्र सरकारने २०१३ मध्ये अधिनियमाद्वारे महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन बंधनकारक केले आहे. मात्र, याची कडक अंमलबजावणी राज्यांमध्ये झालेली नाही. दर सहा वर्षांनी पुन्हा मान्यता घ्यावी लागते. देशातील उच्च शिक्षण संस्थेचे २०२२ पर्यंत मूल्यांकन व किमान २.५ गुणांचे लक्ष्य यूजीसीने ठेवले आहे. त्यासाठी २०१९ मध्ये 'परामर्श' योजना लागू करण्यात आली. यात १६५ हून अधिक महाविद्यालयांची मार्गदर्शक (मेंटर) म्हणून निवड करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी यूजीसीने महाविद्यालयांच्या मूल्यांकनाबाबतचे परिपत्रक जाहीर केले आहे.

> "यूजीसीच्या नियमावलीप्रमाणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्रत्येक महाविद्यालयाने नॅक मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे. नॅक मूल्यांकनाच्या माध्यमातून महाविद्यालयांनी गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.
>
> **- डॉ. एम. एस. देशमुख,**
> संचालक, अंतर्गत गुणवत्ता व हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ



**शिवाजी विद्यापीठातून...**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांचा समावेश असून, २७६ महाविद्यालये आहेत. सद्य:स्थितीत १०४ महाविद्यालये नॅक मूल्यांकनप्राप्त आहेत. कोरोना व अडचणींमुळे काही महाविद्यालयांचे गत वर्षात मूल्यांकन होऊ शकलेले नाही. काही महाविद्यालयांनी मूल्यांकन केले; पण त्यांना अपेक्षित गुण मिळाले नाहीत, यासह वेगवेगळी कारणे असण्याची शक्यता आहे. खासगी विनाअनुदानित महाविद्यालये मूल्यांकन करून घेत नसल्याची बाब समोर आली आहे.

उच्चशिक्षण संस्थांचे मूल्यांकन व पडताळणी करून 'नॅक' गुण जाहीर करते. 'नॅक' मान्यतेसाठी १२१ ते १३७ घटकांद्वारे विद्यापीठ, महाविद्यालयांचे मूल्यांकन केले जाते. ३०० गुण हे गुणात्मक व ७०० गुण हे संख्यात्मक दर्जा यासाठी दिले जातात. विविध अभ्यासक्रम, शिकणे-शिकविणे, संशोधन विस्तार, पायाभूत सुविधा, आजी-माजी विद्यार्थी, रोजगार संधी, नावीन्यपूर्ण उपक्रम हे बिंदू मूल्यांकनासाठी महत्त्वाचे आहेत.

### मानांकनाकडे सर्वांचे लक्ष

शिवाजी विद्यापीठाची नॅक मूल्यांकनाची मुदत डिसेंबर २०१९ मध्ये संपली आहे. तिसऱ्या टप्प्यात विद्यापीठास 'ए' मानांकन मिळाले होते. कोरोनामुळे गेल्या वर्षातील नॅक मूल्यांकनाची तयारी सुरू आहे. चौथ्या टप्प्यातील मूल्यांकनासाठी १५ ते १७ मार्च दरम्यान नॅक बेंगलोरची टीम विद्यापीठात दाखल होणार आहे. यावेळी विद्यापीठास कोणते मानांकन मिळणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# विद्यापीठात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

**कोल्हापूर ( पुढारी वृत्तसेवा ) :** शिवाजी विद्यापीठात संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एच. एम. ठकार, डॉ. एस.डी. डेळेकर उपस्थित होते.

# विद्यापीठात संत गाडगेबाबा यांची जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात संत गाडगेबाबा यांची जयंती मंगळवारी उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, एमबीए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार, अधिसभा सदस्य डॉ. एस. डी. डेळेकर यांच्यासह एमबीए, रसायनशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभागाचे शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यापीठात संत गाडगेबाबांची जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत गाडगेबाबा यांची जयंती मंगळवारी उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एच. एम. ठकार, डॉ. एस. डी. डेळेकर आदी उपस्थित होते.

# तासाभरात उचलले पाच हजार किलो प्लास्टिक

## कोल्हापूर अर्थ वॉरिअर्सच्या 'मी गाडगेबाबा अभियाना'त १५०० लोकांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळण्याबरोबरच विक्रेत्यांनी प्लास्टिकचा वापर पूर्णतः कसा टाळता येईल, याचा विचार करणे आणि त्याला पर्याय निवडला, तरच शहर प्लास्टिकमुक्त होऊ शकेल, असे प्रतिपादन अ. भा. शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या मार्गदर्शक संयोगिताराजे छत्रपती यांनी केले.

कोल्हापूर अर्थ वॉरियर्सच्या 'मी गाडेगाबाबा' अभियानाचे उद्घाटन संयोगीताराजे यांच्या हस्ते झाले. प्रारंभी संत गाडगेबाबांच्या पुतळ्यास अभिवादन करून प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी कोल्हापूर 'अर्थ वॉरिअर्स'चे निमंत्रक सुबोध भिंगार्डे व डॉ. सूर्यकिरण वाघ, अॅड. केदार मुनीश्वर, उदय गायकवाड, तृप्ती देशपांडे, आदिती गर्गे, प्र. द. गणपुले, महापालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे, राहुल राजगोळकर उपस्थित होते.

मंगळवारी शहरात एका तासात ५० हून अधिक ठिकाणी १५०० हून अधिक नागरिकांच्या व विविध संस्थांच्या स्वयंसेवकांनी ५ हजार किलोंपेक्षा अधिक प्लास्टिक कचरा संकलित केला. यामध्ये प्रामुख्याने शहर, उपनगरे व शहरालगतच्या ग्रामपंचायती, सर्व उद्याने, औद्योगिक वसाहती यांचा समावेश होता. महापालिकेच्या उद्यान विभागाकडून शहरातील १४ उद्यानांतील १२६ कर्मचाऱ्यांनी ७० पोती प्लास्टिक कचरा संकलित केला. यासाठी उद्यान निरीक्षक अरुण खाडे, राम चव्हाण व अनिकेत जाधव यांनी काम पाहिले.



**कोल्हापूर : अर्थ वॉरिअर्सतर्फे आयोजित मी गाडगेबाबा अभियानांतर्गत शहरासह आसपासच्या उपनगरे, ग्रामीण भाग, शैक्षणिक संस्था व औद्योगिक वसाहतींमध्ये मंगळवार स्वच्छता मोहिमे अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले.** (छाया : पप्पू अत्तार)

शहरालगतच्या गावांतून २२०० किलो प्लास्टिक संकलित झाले असून मुख्य कार्यकारी अधिकारी संजय सिंह चव्हाण व उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली २३ ग्रामपंचायतींकडून प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

शहरातील अनेक शाळांनी कचरा संकलित करून सहभाग नोंदवला. शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते अभियानाची सुरुवात झाली. २५ विद्यार्थ्यांकडून १० पोती प्लास्टिकचे संकलन करण्यात आले. आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे व उपायुक्त निखिल मोरे यांनी शहरातील सर्व संकलित कचऱ्याचे एकत्रीकरण करणे व त्याची विल्हेवाट लावणे यासाठी पूर्ण नियोजन करून नागरिकांना आवाहन केले. किर्लोस्कर उदयोग समूहातर्फे धीरज जाधव, राहुल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ४० कर्मचाऱ्यांनी पंचगंगा पूल ते वडणगे फाटा दरम्यान ४० पोती प्लास्टिक कचरा संकलित केला. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वसाहतीमधील कचऱ्याचे देखील संकलन झाले.

विजयसिंह सावंत, सीए अभिजित कुलकर्णी, युवराज गुरव, आशिष कौगळेकर, परितोष उरकुडे, तात्या गोवावाला, प्रमिला बतासे व सहकाऱ्यांनी संयोजन केले.

### सहभागी संस्था, संघटना

वृक्षप्रेमी संस्था, स्वरा फाऊंडेशन, रोटरी क्लब, समृद्धी विकास मंच, जरग फाऊंडेशन, चांगुलपणाची चळवळ, खाटिक समाज कोल्हापूर, फेरीवाला संघटना, किर्लोस्कर उद्योग समूह, क्रेडाई, वुई केअर सोशल फाऊंडेशन, प्लास्टिक रिसायकल प्रोजेक्ट, करवीर नगर वाचन मंदिर, केडीएमजी, स्वयंप्रभा मंच, निसर्ग मित्र, गार्डन क्लब कोल्हापूर



कोल्हापूर : लोकसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठात प्लास्टिक संकलन करताना विद्यार्थी, शिक्षक. (छाया : नाज ट्रेनर)

# लोकसंत गाडगेबाबा जयंतीनिमित्त विद्यापीठात प्लास्टिक संकलन उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून लोकसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त प्लास्टिक संकलन करण्यात आले.

उपक्रमात शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभाग व राजाराम महाविद्यालयातील स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. विद्यापीठ परिसरातून १५ पोती प्लास्टिक संकलन करण्यात आले. यात पाणी बॉटल, प्लास्टिकच्या पिशव्या बॅग आदींचा समावेश आहे. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कक्षचे संचालक प्रा. अभय जायभाये, तंत्रज्ञान विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा अमोल कुलकर्णी उपस्थित होते.

# ‘स्वयं अर्थसाहाय्य’तील प्राध्यापकांना सातवा वेतन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात स्वयं अर्थसहाय्यावर चालणारे अभ्यासक्रम आहेत. या अभ्यासक्रमांसाठी नियुक्त प्राध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी ही बैठक झाली.

संगणकशास्त्र अधिविभागात पी. जी. डिप्लोमा इन डाटा सायन्स नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय झाला. मागील वर्षात न झालेल्या परीक्षेची फी विद्यार्थ्यांना परत देण्याबाबत चर्चा झाली. कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना आर्थिक मदत व संगणक केंद्र आढावा घेण्यासाठी समिती नेमण्यात आली.

# पदार्थ विश्लेषणात्मक अभ्यासात शिवाजी विद्यापीठ अग्रेसर : डॉ. वासंबेकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पदार्थ विश्लेषण ही एक जटिल प्रक्रिया असून प्रयोगशाळा, उद्योग, तंत्रज्ञान अशा अनेकविध क्षेत्रांमध्ये अत्यावश्यक म्हणून गणली जाते. शिवाजी विद्यापीठ अत्याधुनिक कुशल तंत्रज्ञाच्या जोरावर पदार्थ विश्लेषणात्मक संशोधन- अभ्यासात अग्रेसर राहिले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रा. पी. एन. वासंबेकर यांनी केले.

विद्यापीठाच्या शास्त्रीय उपकरणे केंद्र (युसिक) व सर्वसाधारण सुविधा केंद्र (सीएफसी) यांच्यामार्फत चार दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते.

प्रा. वासंबेकर म्हणाले, विद्यापीठाच्या युसिक व सीएफसीमधील अत्याधुनिक उपकरणे व येथे चालणारे उपक्रम केवळ शैक्षणिक क्षेत्रासाठीच नव्हे तर औद्योगिक व तंत्रज्ञान निर्मितीच्या कामासाठी उपयुक्त ठरणारे आहेत. प्रा. आर. जी. सोनकवडे म्हणाले, वैज्ञानिक विश्लेषणासाठी अत्यावश्यक सहजासहजी उपलब्ध न होणारी एक्स-रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोप (एक्सपीएस) व ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोप (टीईएम) ही उपकरणे सीएफसीमध्ये उपलब्ध झाली आहेत. यावेळी पदार्थविज्ञान अधिविभागाच्या प्रा. विजया पुरी, डॉ. ए.बी. काकडे, डॉ. जे.बी. यादव आदी उपस्थित होते.

# पदार्थ विश्लेषणात्मक अभ्यासात विद्यापीठ अग्रेसर

## डॉ. वासंबेकर : 'स्ट्राईड' कार्यक्रमांतर्गत कार्यशाळेस प्रारंभ

कोल्हापूर, ता. २३ : "पदार्थ विश्लेषण ही एक जटिल प्रक्रिया असून प्रयोगशाळा, उद्योग, तंत्रज्ञान अशा क्षेत्रांत अत्यावश्यक गणली जाते. शिवाजी विद्यापीठ अत्याधुनिक कुशल तंत्रज्ञानावर पदार्थ विश्लेषणात्मक संशोधनात अग्रेसर राहिले आहे," असे प्रतिपादन इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रा. पी. एन. वासंबेकर यांनी केले.

विद्यापीठाच्या शास्त्रीय उपकरणे केंद्र (युसिक), सर्वसाधारण सुविधा केंद्रातर्फे (सीएफसी) चार दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेस प्रारंभ झाला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 'स्ट्राईड' कार्यक्रमांतर्गत कार्यशाळा होत आहे. प्रा. वासंबेकर म्हणाले, "विद्यापीठाच्या युसिक, सीएफसीमधील अत्याधुनिक उपकरणे, उपक्रम शैक्षणिक नव्हे, औद्योगिक, तंत्रज्ञान निर्मितीच्या कामासाठी उपयुक्त आहेत."

विभागप्रमुख प्रा.आर.जी. सोनकवडे म्हणाले, " पदार्थ विश्लेषणासाठी आवश्यक असणारी बहुतेक सामग्री, उपकरणे युसिक-सीएफसीमध्ये उपलब्ध आहेत. यात फॉरियर ट्रान्सफॉर्म इन्फ्रारेड स्पेक्ट्रोमीटर, गॅस क्रोमॅटोग्राफी, मास स्पेक्ट्रोमीटर, थर्मल ग्रॅव्हमॅट्रिक-डिफरन्शियल ॲनालिसिस-डिफरन्शियल स्कॅनिंग कॉलॉरीमीटर, इंडक्टीव्हली कपल्ड प्लाझ्मा ऑप्टीकल एमिशन स्पेक्ट्रोस्कोप, मायक्रोवेव्ह डायजेस्टीव्ह सिस्टीम, पार्टिकल साइझ एनालायझर विथ झेटा पोटॅन्शियल उपकरणांचा समावेश आहे. त्यात एक्स-रे डिफ्रॅक्टोमीटर (एक्सआरडी एडव्हान्स्ड डी), व्हेक्टर नेटवर्क एनालायझर (व्हीएनए), अल्ट्रा सेंट्रिफ्युज, बायो-एटॉमिक फोर्स मायक्रोस्कोप (बायो-एएफएम), मायक्रो-रामन स्पेक्ट्रोमीटर उपकरणांची भर पडली आहे."

कार्यशाळेमध्ये युसिक, सीएफसीमधील उपकरणांच्या वापराची माहिती देण्यात येणार आहे. प्रा. विजया पुरी, आर.आय. टी.इस्लामपूरचे डॉ. ए. बी. काकडे, वैज्ञानिक अधिकारी डॉ. जे. बी. यादव यांचा समावेश आहे.

# पदार्थ विश्लेषणात 'शिवाजी' अग्रेसर

## डॉ. पी. एन. वासंबेकर यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पदार्थ विश्लेषण ही एक जटिल प्रक्रिया असून प्रयोगशाळा, उद्योग, तंत्रज्ञान अशा अनेकविध क्षेत्रांमध्ये अत्यावश्यक म्हणून गणली जाते. शिवाजी विद्यापीठ आपल्या अत्याधुनिक कुशल तंत्रज्ञांच्या जोरावर पदार्थ विश्लेषणात्मक संशोधन-अभ्यासात अग्रेसर राहिले आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रा. पी. एन. वासंबेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शास्त्रीय उपकरणे केंद्र (युसिक) व सर्वसाधारण सुविधा केंद्र (सीएफसी) यांच्यामार्फत चार



दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेस सोमवारी प्रारंभ झाला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्ट्राईड कार्यक्रमांतर्गत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. वासंबेकर बोलत होते.

सीएफसी विभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे म्हणाले, पदार्थ विश्लेषणासाठी आवश्यक असणारी बहुतेक सारी सामग्री व उपकरणे युसिक-सीएफसीमध्ये उपलब्ध आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वैज्ञानिक विश्लेषणासाठी अत्यावश्यक असणारी पण सहजासहजी उपलब्ध न होणारी उपकरणेही सीएफसीमध्ये उपलब्ध झाली असून लवकरच ती कार्यान्वित करण्यात येणार आहेत. कार्यशाळेस विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रा. पी. एन. वासंबेकर, प्रा. विजया पुरी, प्रा. आर. जी. सोनकवडे, आरआयटी इस्लामपूरचे डॉ. ए. बी. काकडे, वैज्ञानिक अधिकारी डॉ. जे. बी. यादव यांच्यासह संबंधित उपकरणांचे अभियंते उपस्थित होते.

# ‘पत्रकारिता शोध आणि बोध’चे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे गुरुवार, दि. २५ रोजी सकाळी १०.३० वाजता पत्रकार सचिन मदनराव वायकुळे लिखित ‘पत्रकारिता शोध आणि बोध’ या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. विद्यापीठाच्या मानवशास्त्र सभागृहात हा समारंभ होईल. कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार सम्राट फडणीस, महापालिकेचे उपायुक्त विनायक औंधकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे आहेत. यावेळी सांगली जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे, मिरज-कुपवाड नगरपालिकेचे आरोग्याधिकारी डॉ. रवींद्र ताटे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली आहे.